0 7 OCT 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'नॅसकॉम' समवेत शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग आणि नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्व्हिस कंपनीज अर्थात 'नॅसकॉम'चे आयटी सेक्टर स्किल्स कौन्सिल यांच्यामध्ये कॉर्पोरेट कॅम्पस कनेक्टसाठी सामंजस्य करार करण्यात आला.

करारामुळे विद्यापीठामध्ये माहिती तंत्रज्ञानाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे कौशल्य शिक्षण मिळेल, त्याचप्रमाणे आयटी उद्योगालाही प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होईल, असा विश्वास कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि नॅसकॉम यांच्यादरम्यान झालेल्या सामंजस्य कराराच्या प्रतींचे हस्तांतरण करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि नॅसकॉमचे डॉ. चेतन सामंत. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी.

नॅसकॉमकडून डेटा टेक लॅब (पुणे), टुडीप टेक्नॉलॉजिज (पुणे) आणि व्हिक्रेटेक कन्सल्टिंग (पुणे) या तीन कंपन्यांमार्फत अधिविभागातील विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रासाठी उपयुक्त कौशल्ये आणि अद्ययावत तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण मोफत मिळेल.

या करारामुळे भविष्यात तंत्रज्ञान अधिविभागामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि डेटा सायन्स यासंदर्भातील सेंटर ऑफ एक्सलन्स स्थापन करण्यासाठीही नॅसकॉमच्या तज्ज्ञांचे साहाय्य उपलब्ध होईल.


सामंजस्य करारावर कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि नॅसकॉमचे वरिष्ठ संचालक डॉ. चेतन सामंत यांनी स्वाक्षरी केल्या. प्रास्ताविक डॉ. एस. एन. सपली यांनी केले. यावेळी प्र.कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, नॅसकॉमचे उपसंचालक सौरभ मिश्रा व रोहित प्रसाद, डॉ. अमित अंद्रे, अभिषेक राठी, कृष्णकुमार द्विवेदी आणि नीलेश ढपले उपस्थित होते. डॉ. गणेश पाटील, डॉ. चेतन आवटी, अमर डुम, डॉ. श्यामकुमार चव्हाण, डॉ. रश्मी देशमुख आणि प्रवीण प्रभू यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

0 7 OCT 2024
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नागरी बँकांसंदर्भात 'आरबीआय'चे नेहमी सकारात्मक धोरण : सतीश मराठे

कोल्हापूर : प्रतिनिधी

उत्तम कामगिरीचे प्रदर्शन करणाऱ्या नागरी सहकारी बँकांच्या बाबतीत रिझर्व्ह बँकेने नेहमीच सकारात्मक धोरण अवलंबले आहे, असे प्रतिपादन भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे यांनी शनिवारी येथे केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात बोलताना सतीश मराठे. सोबत इतर मान्यवर.

शिवाजी विद्यापीठाचे गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र आणि जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने इनामदार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'सहकारी बँकांसमोरील प्रश्न व रिझर्व्ह बँक' या विषयावरील चर्चेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, तर जिल्हा नागरी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष निपुण कोरे प्रमुख उपस्थित होते.

अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आर्थिक संस्थांनी पुढील किमान पाच वर्षांच्या वाटचालीची दिशा निर्धारित करणाऱ्या कृती आराखड्याची निर्मिती करावी. त्यासाठी विद्यापीठातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येईल. अशा प्रकारचे विधायक सुसंवाद यापुढील काळातही सातत्याने घडून यायला हवेत. त्यासाठीही विद्यापीठ नागरी सहकारी बँकांना सर्वतोपरी मदत करेल. बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष कोरे यांचेही भाषण झाले.

स्वागत व प्रास्ताविक केंद्राचे संचालक डॉ. राजन पडवळ यांनी केले. अधिसभा सदस्य संजय परमणे यांनी गुरुवर्य लक्ष्मण इनामदार यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला. मान्यवरांच्या हस्ते इनामदार यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी वैशाली आवाडे, अनिल देसाई, सुधाकर जाधव यांच्यासह नागरी सहकारी बँकांचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक, अधिकारी, पदाधिकारी संख्येने उपस्थित होते.